श्री. विजय श्रीधर जाधव यांचे प्रकरणी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ औरंगाबाद यांनी मुळ अर्ज क्र.४८५/२०२० मध्ये, दि.०१/०८/२०२२ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने त्यांच्याकरीता दि.०१/०६/२०१२ पासून ०१ अधिसंख्य वनमजूराचे पद निर्माण करुन सदरहू तारखेपासून ते जुलै-२०२५ पर्यंत त्यांना अनुज्ञेय असलेली मजूरी थकबाकी रु.१०,४१,४२२/- इतकी रक्कम अदा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : एस-३०/२०२५/९६५/प्र.क्र.११५/वने-१२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०३ ऑगस्ट, २०२६.

वाचा :- १) मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ यांचा मुळ अर्ज क्र.४८५/२०२० मधील दि.०१/०८/२०२२ चा न्याय निर्णय.

२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-३१/७(२)/विधी/प्र.क्र.४३(२०-२१)/६६१/२५-२६, दि.१६/०९/२०२५.

३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष- विधी-३१/७/(२)/रोवम/प्र.क्र.४३(२०-२१)/८८५/२५-२६, दि.०३/१२/२०२५.

४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष- विधी-३१/७/(२)/रोवम/प्र.क्र.४३/(२०-२१)/१००२/२५-२६, दि.२८/०१/२०२६.

५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-३१ /७(२)/विधी/प्र.क्र.४३/१०६७/२०-२१, दि.१७/०२/२०२६.

६) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.वेतन-१०१८/प्र.क्र.३४/सेवा-३, दि.१७/०८/२०२३.

प्रस्तावना :-

श्री. विजय श्रीधर जाधव हे वनपरिक्षेत्र, पाटोदा या कार्यालयात मजूर म्हणून कार्यरत होते. त्यांनी विभागीय वन अधिकारी (प्रा.), बीड यांनी दि.११/०९/२०१८ रोजी वनमजूर म्हणून कायम करण्याबाबत प्राठविलेल्या प्रस्तावास अंतिम करुन त्यांना दि.०१/०६/२०१२ पासुन कायम वनमजूर म्हणून नियुक्ती देण्याबाबत मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण, खंडपीठ औरंगाबाद येथे मुळ अर्ज क्र.४८५/२०२० दाखल केला. त्यामध्ये मा. न्यायाधिकरणाने दि.०१/०८/२०२२ रोजी झालेल्या सुनावणी श्री. जाधव, यांच्याकडून शासन निर्णय, दि.१६/१०/२०१२ मधील तरतुदींची पुर्तता होत असल्याचे निरीक्षण नोंदवून त्यांना सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार अधिसंख्य वनमजूर या पदावर नियमित करण्याबाबतची कार्यवाही ४ महिन्याच्या कालावधीमध्ये पूर्ण करावी असे अंतिम आदेश पारीत केले.

२. तथापि, श्री. जाधव हे शासन निर्णय, दि.१६/१०/२०१२ मधील तरतुदींची पुर्तता करीत नसल्याने, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), नागपूर यांच्या कार्यालयाने दि.११/०१/२०२३ च्या पत्रान्वये, प्रस्ताव नस्तीबध केला.

३. मा. न्यायाधिकरणाच्या दि.०१/०८/२०२२ च्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्याने अर्जदार श्री. जाधव, यांनी मा. न्यायाधिकरणात अवमान अर्ज क्र.६२/२०२३ दाखल केला. सदर प्रकरणी दि.२९/०७/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीत मा. न्यायाधिकरणाच्या दि.०१/०८/२०२२ च्या आदेशाची अंमलबजावणी, प्रतिवादीकडून चुकीच्या पध्दतीने झाली असल्याबाबतची गंभीर दखल घेऊन प्रतिवादी विरुध्द नियमानुसार अवमान प्रक्रीया सुरु करण्याबाबत मा.न्यायाधिकरणाने आदेशित केले.

४. उपरोक्त प्रस्ताव, मा. न्यायाधिकरणाचे दि.०१/०८/२०२२ रोजीचे आदेश, सादरकर्ता अधिकारी यांचे दि.०७/१०/२०२२ रोजीचे अभिमत व अवमान याचिकेत दि.२९/०७/२०२५ रोजी दिलेल्या निर्देश विचारात घेता, श्री. जाधव यांना शासन निर्णय, दि.१६/१०/२०१२ मधील तरतुदीनुसार दि.०१/०६/२०१२ पासून अधिसंख्य वनमजूर या पदावर नियमित करण्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत शासन पत्र दि.१२/१२/२०२५ अन्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), नागपूर यांच्या कार्यालयास कळविण्यात आले.

५. मा. न्यायाधिकरणाच्या दि.०१/०८/२०२२ च्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने श्री. जाधव, यांना शासन निर्णय, दि.१६/१०/२०१२ मधील तरतुदीनुसार दि.०१/०६/२०१२ पासून अनुज्ञेय ठरणाऱ्या थकबाकीची रक्कम रु.१०,४१,४२२/- लेखाशिर्ष २४०६-१८९८ मध्ये उपलब्ध करुन देवून नवीन पदनिर्मितीच्या प्रस्तावास मान्यता देण्याची विनंती प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), नागपूर यांनी दि.२८/०१/२०२६ व दि.१७/०२/२०२६ च्या पत्रान्वये शासनास केलेली आहे.

६. सदर प्रकरणी मा. न्यायाधिकरणाच्या दि.०१/०८/२०२२ च्या आदेशाने अंतिम स्वरुप धारण केले असल्याने, सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबतची विभागाची धारणा विधी व न्याय विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी पक्की केली आहे.

७. श्री. विजय श्रीधर जाधव, रोजंदारी मजूर यांच्या प्रकरणी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मुळ अर्ज क्र.४८५/२०२० मध्ये, दि.०१/०८/२०२२ व अवमान अर्ज क्र.६२/२०२३ मध्ये, दि.२९/०७/२०२५ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने श्री.जाधव यांचेकरीता शासन निर्णय, दि.१६/१०/२०१२ मधील तरतुदीनुसार त्यांच्याकरीता दि.०१/०६/२०१२ पासून ०१ अधिसंख्य पद निर्माण करुन त्यांना अनुज्ञेय असणारी जुलै, २०२५ पर्यंतच्या थकबाकीची रक्कम रु.१०,४१,४२२/- इतका खर्चास मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

श्री. विजय श्रीधर जाधव, रोजंदारी मजूर यांच्या प्रकरणी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मुळ अर्ज क्र.४८५/२०२० मध्ये, दि.०१/०८/२०२२ व अवमान अर्ज क्र.६२/२०२३ मध्ये, दि.२९/०७/२०२५ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने श्री. जाधव यांचेकरीता शासन निर्णय, दि.१६/१०/२०१२ मधील तरतुदीनुसार त्यांच्याकरीता

दि.०१/०६/२०१२ पासून ०१ अधिसंख्य पद निर्माण करुन त्यांना जुलै, २०२५ पर्यंतच्या थकबाकीची रक्कम रु.१०,४१,४२२/- (अक्षरी रुपये दहा लाख एकेचाळीस हजार चारशे बावीस रुपये फक्त) इतकी रक्कम मागणी क्र. सी ७, २४०६ वनीकरण व वन्यजीवन १०१ वनसंधारण व विकास १०१ (१२) वन मजुरांच्या अधिसंख्य पदांची निर्मिती (२४०६-१८९८) "०१-वेतन" या लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध करुन देण्यास या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरहू न्यायालयीन प्रकरणाची संपूर्ण जबाबदारी क्षेत्रिय कार्यालयाची राहील. तसेच, सेवाविषयक कालावधीतील उपस्थितीची तपासणी करुन थकबाकी रक्कमेची अचूक परिगणना करुन थकबाकी अदा करण्याची जबाबदारी वनसंरक्षक (प्रा.), छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयाची राहील. तसेच वाचा येथील अ.क्र.०६, वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.१७/०८/२०२३ मधील मागदर्शक तत्वाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

३. उक्त खर्च मागणी क्रमांक सी-७, २४०६ वनीकरण व वन्यजीवन, १०१ वनसंरक्षण, विकास व पुनर्निर्मिती, (१२) वन कामगारांसाठी अधिसंख्य पदांची निर्मिती, (१२) (०१) वन कामगारांसाठी अधिसंख्य पदांची निर्मिती (अनिवार्य), (२४०६-१८९८) ०१-वेतन या लेखाशिर्षातंर्गत सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. सदरचा शासन निर्णय, वित्त विभाग, अनौ.संदर्भ क्र.३१९/व्यय-१०, दि.२२/०६/२०२६ व अनौपचारिक संदर्भ क्र.१७१/आपुक, दि.२८/०७/२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०८०३११०४३२७०४० असा आहे. सदरचा शासन निर्णय डिटीजल स्वाक्षरीने सांक्षाकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANJUSHA DATTATRAY SONJE

Digitally signed by MANJUSHA DATTATRAY SONJE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department, 2.5.4.20=8E491E40DA312B87356D474F3637BDB55DFF1AA207B1723030265AD04926CADB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=14ABD3DD33A977D709D803B6057EB9FE0DE69BD4ACD4BF7CA36CED00F53EA72C, cn=MANJUSHA DATTATRAY SONJE
Date: 2026.08.03 11:06:56 +05'30'

(मंजुषा सोनजे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
५) वनसंरक्षक (प्रादेशिक), छत्रपती संभाजीनगर.
६) विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक), वनविभाग, बीड.
७) जिल्हा कोषागार अधिकारी, बीड.
८) कार्यासन अधिकारी (व्यय-१० / आपुक), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) कार्यासन अधिकारी (ब-१ / वने-२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवडनस्ती (वने-१२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.